ePaper

## जीवाशी खेळ! शाळा, रुग्णालय ते अंत्ययात्रेपर्यंत 'या' गावकऱ्यांची रोजच अग्निपरीक्षा



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™




पान 3 वरुन...

चिंचवड यात्रेत 'मेड इन पाकिस्तान' चादरीची विक्री?

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 10 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीची हक्काची!

### भारतीय तरुणांना दिलासा, H-1B व्हिसावरील वादग्रस्त निर्णय अमान्य

# डोनाल्ड ट्रम्पना अमेरिकन कोर्टाचा दणका



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इमिग्रेशन धोरणाला मोठा धक्का बसला असून एच-१बी व्हिसावर लादण्यात आलेले १ लाख डॉलर्स (सुमारे ८३ लाख रुपये) शुल्क अमेरिकेतील फेडरल न्यायालयाने बेकायदेशीर ठरवत रद्द केले आहे. या निर्णयामुळे अमेरिकेत नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो भारतीय आयटी व्यावसायिकांसह तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.**


मॅसॅच्युसेट्समधील फेडरल न्यायालयाचे जिल्हा न्यायाधीश लिओ सोरोकिन यांनी हा निर्णय देताना ट्रम्प प्रशासनावर ताशेरे ओढले. कंपन्यांवर अशा प्रकारचा अतिरिक्त आर्थिक बोजा टाकण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना नसून तो केवळ अमेरिकन संसदेलाच असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे हा आदेश घटनाबाह्य ठरत असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

ट्रम्प प्रशासनाने अमेरिकन नागरिकांच्या नोकऱ्यांचे संरक्षण आणि व्हिसा व्यवस्थेतील गैरप्रकार रोखण्याच्या उद्देशाने एच-१बी व्हिसासाठीचे शुल्क तब्बल १ लाख डॉलर्सपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे जगभरातील तंत्रज्ञान क्षेत्रात चिंता निर्माण झाली होती. विशेषतः भारतीय आयटी क्षेत्रावर त्याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

अमेरिका दरवर्षी ६५ हजार नियमित आणि २० हजार उच्च शिक्षित उमेदवारांसाठी एच-१बी व्हिसा जारी करते. या व्हिसाचा सर्वाधिक लाभ भारतीय व्यावसायिकांना मिळत असून एकूण लाभार्थ्यांपैकी सुमारे ७० टक्के भारतीय असतात. त्यामुळे शुल्कवाढीच्या निर्णयाला भारतीय उद्योग क्षेत्राकडून तीव्र विरोध करण्यात आला होता.

यापूर्वी एच-१बी व्हिसासाठी कंपन्यांना साधारण दोन ते पाच हजार डॉलर्स खर्च करावे लागत होते. मात्र ट्रम्प प्रशासनाने हे शुल्क थेट एक लाख डॉलर्सपर्यंत वाढविले होते. न्यायालयाच्या निर्णयानंतर आता पूर्वीची शुल्करचना कायम राहणार आहे.

दरम्यान, ट्रम्प यांच्या कठोर इमिग्रेशन धोरणांना न्यायालयाने दिलेला हा मोठा धक्का मानला जात असून अमेरिकेतील उद्योग, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रालाही या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे.




### भारतीय आयटी क्षेत्रासाठी एच-१बी व्हिसाचे महत्त्व

एच-१बी व्हिसा हा अमेरिकेतील कंपन्यांना विशेष कौशल्य असलेल्या परदेशी व्यावसायिकांना नोकरी देण्यासाठी वापरला जाणारा सर्वात महत्त्वाचा व्हिसा प्रकार मानला जातो. सॉफ्टवेअर अभियांत्रिकी, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, वित्तीय सेवा, आरोग्यसेवा, जैवतंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रात या व्हिसाचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. अमेरिका दरवर्षी ६५ हजार नियमित आणि २० हजार उच्च शिक्षण घेतलेल्या उमेदवारांसाठी एच-१बी व्हिसा जारी करते. या व्हिसाचा सर्वाधिक फायदा भारतीय व्यावसायिकांना होतो. उपलब्ध आकडेवारीनुसार, एच-१बी व्हिसा मिळविणाऱ्यांपैकी सुमारे ७० टक्के उमेदवार भारतीय असतात. त्यामुळे शुल्कवाढीचा सर्वाधिक फटका भारतीय आयटी कंपन्या आणि व्यावसायिकांना बसला असता.

### न्यायालयाची ट्रम्प प्रशासनाला फटकार

निर्णय देताना न्यायालयाने नमूद केले की, एच-१बी व्हिसावर आकारण्यात आलेले १ लाख डॉलर्सचे शुल्क हे केवळ प्रशासकीय शुल्क नसून प्रत्यक्षात एक प्रकारचा कर आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेनुसार नवीन कर लागू करण्याचा किंवा विद्यमान शुल्कामध्ये एवढी मोठी वाढ करण्याचा अधिकार काँग्रेसकडे आहे. त्यामुळे राष्ट्राध्यक्षांच्या आदेशाद्वारे असा निर्णय लागू करता येत नाही. या शुल्कवाढीविरोधात २० डेमॉक्रॅटिक राज्यांच्या सर्वोच्च कायदा अधिकाऱ्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. या शुल्कवाढीमुळे राज्यांची अर्थव्यवस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, रुग्णालये आणि तंत्रज्ञान उद्योग यांना मोठा फटका बसेल, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत ट्रम्प प्रशासनाचा निर्णय रद्द केला.

### काय होता वादग्रस्त निर्णय?

अमेरिकन नागरिकांच्या रोजगाराचे संरक्षण आणि परदेशी कामगारांवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने ट्रम्प प्रशासनाने एच-१बी व्हिसा धोरण अधिक कठोर करण्याची भूमिका घेतली होती. त्याचाच एक भाग म्हणून नव्या एच-१बी व्हिसासाठी कंपन्यांना १ लाख डॉलर्स शुल्क भरणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयामुळे अमेरिकेत परदेशी कुशल कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे कंपन्यांसाठी अत्यंत खर्चिक ठरणार होते. विशेषतः तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांनी या निर्णयाला तीव्र विरोध केला होता. कारण यामुळे जागतिक प्रतिभा आकर्षित करण्याची अमेरिकेची क्षमता कमी होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

# पुण्यात पाणीकपात जाहीर!

## येत्या 15 जूनपासून दिवसाआड पाणीपुरवठा; सर्वपक्षीय बैठकीत निर्णय

**महाईन्यूज । पुणे**

**मान्सूनच्या आगमनास झालेला विलंब आणि खडकवासला धरण साखळीतील झपाट्याने घटणाऱ्या पाणीसाठ्यामुळे पुणेकरांवर पाणीकपातीची कुऱ्हाड कोसळली आहे. शहरात येत्या सोमवारपासून ( १५ जून) एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. महापौर मंजूषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले. नव्या वेळापत्रकाबाबतचे सविस्तर परिपत्रक पुढील दोन दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे.**



पुढील तीन महिने पिण्याच्या पाण्याची गरज, आषाढी वारीसाठी लागणारे पाणी आणि शेतीसाठी आवश्यक आवर्तने यांचा विचार करता उपलब्ध साठ्याचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक असल्याचे या वेळी महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी सर्वपक्षीय नेत्यांपुढे नमूद केले.

उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेते गणेश बीडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, विरोधी पक्षनेते नीलेश निकम, काँग्रेसचे गटनेते चंदू कदम, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर; तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकुमार जगताप या बैठकीस उपस्थित होते.

‘ज्या भागांमध्ये आधीपासूनच कमी दाबाने किंवा एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे, त्या भागांवर अतिरिक्त कपात लादली जाणार नाही,’ असे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी स्पष्ट केले. त्यामध्ये हडपसर, काळेपडळ, कोल्हेवाडी, नांदोशी, महंमदवाडी, शिवाजीनगर परिसरातील काही भाग, भाग्योदयनगर, कोंढवा आणि धायरी या परिसरांचा समावेश आहे.

यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज असल्याने चिंता वाढली आहे. धरणांमधील पाण्याचे बाष्पीभवन, वाढती लोकसंख्या आणि वाढलेली मागणी लक्षात घेता पुढील तीन महिने उपलब्ध जलसाठ्यावर तग धरण्याचे मोठे आव्हान महापालिकेसमोर आहे.

### पाणी बचतीसाठी निर्बंध

- शहरातील सर्व वाहन धुलाई केंद्रे (वॉशिंग सेंटर) बंद करण्यात येणार.
- वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यास बंदी.
- बांधकाम प्रकल्पांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर पूर्णतः बंद.
- बांधकामे आणि उद्यानांसाठी शुद्ध केलेले सांडपाणी (एसटीपी वॉटर) वापरणे बंधनकारक.
- व्यावसायिक, तसेच खासगी जलतरण तलावांवर निर्बंध.
- शहरातील विहिरी आणि कूपनलिकांचे सर्वेक्षण करून, पर्यायी जलस्रोतांचा वापर वाढविण्याचा निर्णय.

### धरणांमधील पाणीसाठा

धरण - टीएमसी - टक्के
खडकवासला - ०. ८४ - ४२. ३३
पानशेत - २. २७ - २१. ३६
वरसगाव - १. ९० - १४. ८२
टेमघर - ०. ०० - ०. ०
एकूण - ५. ०१ - १७. १९

“ उपलब्ध पाणीसाठ्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पुणेकरांनी पाण्याचा जपून वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे. पाणी कपातीबाबतचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाला दोन दिवस देण्यात आले आहेत. परिस्थितीनुसार येत्या सोमवारपासून पाणीकपात करण्यात येईल.

**- मंजूषा नागपुरे, महापौर.**

# राज्यातील ६६ हजार शाळांतील विद्यार्थ्यांसाठी ‘बालभारती’कडून अनोखी भेट!

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना पुस्तक भेट देण्यात येणार आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या वाचनाला चालना देण्यासाठी ६६ हजार शाळांना सहा पुस्तकांचा संच देण्यात येणार असून, सर्वसामान्य वाचकांनाही हा संच खरेदी करण्यासाठी उपलब्ध करून दिला जाणार आहे.**






### पुस्तक संचात कोणत्या पुस्तकांचा समावेश?

बालभारतीने तयार केलेल्या पुस्तक संचामध्ये मान्यवर कवींच्या गाजलेल्या कवितांचा समावेश असलेल्या ‘बालभारतीच्या कविता’, ‘स्फूर्तीगीते’, ‘५० किशोर गोष्टी’ (दोन भाग), ‘चित्रकथा’, ‘थोरांची ओळख’ तसेच ‘माझा पहिला इंग्रजी-मराठी शब्दकोश’ या पुस्तकांचा समावेश आहे. त्यामुळे कविता, गोष्टी, प्रेरणादायी गीते, चित्रकथा आणि संत-महापुरुषांची माहिती असे वैविध्यपूर्ण साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे.

सन २०२६-२७ हे बालभारतीचे हीरक महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. या निमित्ताने बालभारतीच्या उद्दिष्टांना अनुसरून शैक्षणिक आणि विद्यार्थी उपयोगी उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने जानेवारीमध्ये बालभारतीच्या पाठ्यपुस्तकांच्या निवडक मुखपृष्ठांचे प्रदर्शन, बालभारतीच्या गीताची निर्मिती, पाच पाठ्येतर पुस्तकांचे प्रकाशन असे उपक्रम करण्यात आले होते. आता त्या पुढे जाऊन विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यासाठी बालभारतीने पुढाकार घेऊन अवांतर वाचनासाठी विशेष पुस्तक संचाची निर्मिती केली आहे. नवे शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर या पुस्तक संचाचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना वितरण केले जाणार आहे.

किशोर मासिकाचे संपादक किरण केंद्रे यांनी पुस्तक संचातील पुस्तकांचे संपादन केले आहे. ते म्हणाले, ‘विद्यार्थ्यांच्या भावविश्वाचा विचार करून पुस्तक संचातील पुस्तकांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यात किशोरमध्ये प्रकाशित झालेल्या कथा कविता, बालभारतीच्या पाठ्यपुस्तकांतील साहित्य समाविष्ट करण्यात आले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुमारे ६६ हजार शाळांना हा संच उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांना ही पुस्तके सुलभरीत्या उपलब्ध होतील. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोड लागण्यास मदत होईल. तसेच, हा संच बालभारतीच्या भांडारांमध्ये, संकेतस्थळाद्वारे सर्वसामान्यांनाही उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे हा पुस्तक संच मोठ्यांसाठीही स्मरणरंजन ठरणार आहे.

# चिखली-कुदळवाडीत पहाटे ३ वाजता कारवाई

## पाच धार्मिक स्थळे जमीनदोस्त, नागरिकांमध्ये संतापाची लाट!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला ८ जून रोजी धार्मिक स्थळावर कारवाई न करण्यासाठी निवेदन देऊनही अखेर ९ जूनच्या पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास चिखली-कुदळवाडी परिसरात पुन्हा एकदा मोठी अतिक्रमण कारवाई करण्यात आली. या कारवाईत मुस्लिम समाजाशी संबंधित पाच धार्मिक स्थळे पाडण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला असून परिसरात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



विशेष म्हणजे, कारवाईपूर्वीच अर्शद अस्लम खान आणि स्थानिक रहिवाशांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांना निवेदन देऊन कारवाईत पारदर्शकता ठेवण्याची मागणी केली होती. तसेच कोणत्याही एका समाजाला लक्ष्य करून कारवाई करू नये, अशी स्पष्ट भूमिका मांडण्यात आली होती.

शहरातील अनेक अनधिकृत बांधकामे दंड आकारून नियमित करण्यात आली आहेत. मग चिखली-कुदळवाडीतील रहिवाशांनाही समान न्याय का दिला जात नाही? अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना अद्याप पाणी, मलनिस्सारण यांसारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. त्यातच १० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या कारवाईत प्रार्थनास्थळे, दुकाने, लघुउद्योग आणि घरे जमीनदोस्त करण्यात आली होती.

मात्र, निवेदन दिल्यानंतर अवघ्या काही तासांतच पुन्हा पहाटेच्या अंधारात कारवाई झाल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "जर सर्वांवर समान कारवाई होत असेल तर केवळ विशिष्ट भाग आणि विशिष्ट समाजाच्या बांधकामांवरच वारंवार बुलडोझर का चालतो?" असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

अर्शद खान यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले की, महापालिकेने कायद्याचे राज्य राखावे, पण कोणत्याही समाजाला टार्गेट केल्याचा आभास निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. समान न्याय आणि पारदर्शकता हीच आमची मागणी आहे.

दरम्यान, या कारवाईमुळे चिखली-कुदळवाडी परिसरात भीती, असुरक्षितता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिक आता न्यायासाठी पुढील कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने लढा उभारण्याच्या तयारीत आहेत.

### समान न्यायाची मागणी

चिखली-कुदळवाडी परिसरातील अतिक्रमण कारवाईनंतर नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. अनधिकृत बांधकामांवर कायदेशीर कारवाई व्हावी, मात्र ती सर्वांवर समान निकषांनुसार आणि पूर्ण पारदर्शकतेने व्हावी, अशी मागणी होत आहे. कोणत्याही विशिष्ट समाजाला लक्ष्य केल्याचा आभास निर्माण होऊ नये, असे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे.

# प्रतीक्षा यादीतील ३३० जणांना घराची संधी; १८ जूनपर्यंत निर्णय घ्या

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (पीएमआरडीए) पेठ क्र. १२ आणि ३०-३२ गृहयोजनेतील प्रतीक्षा यादीतील ३३० लाभार्थ्यांना अखेर सदनिका जाहीर करण्यात आल्या आहेत. मूळ सोडतीमधील लाभार्थ्यांनी सदनिका रद्द केल्यामुळे किंवा मुदतीत न स्वीकारल्यामुळे प्रतीक्षा यादीतील पात्र लाभार्थ्यांना ही सुवर्णसंधी मिळाली आहे.**




'पीएमआरडीए'कडून पेठ क्र.१२ आणि ३०-३२ मधील एकूण १,०२९ सदनिकांसाठी दि. ८ एप्रिल २०२६ रोजी सोडत काढण्यात आली होती. या लॉटरी प्रक्रियेमध्ये एकूण ८७१ लाभार्थी पात्र ठरले होते, तर ३,८४१ अर्जदार अयशस्वी ठरले होते. तसेच, ६५५ लाभार्थ्यांचा समावेश प्रतीक्षा यादीत करण्यात आला होता. पात्र ठरलेल्या ८७१ लाभार्थ्यांना त्यांची सदनिका स्वीकारण्यासाठी किंवा समर्पित (सरेंडर) करण्यासाठी दि. ११ एप्रिल ते २४ एप्रिल २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली होती.

'पीएमआरडीए'ने दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या सोडतीतील ८७१ विजयी लाभार्थ्यांपैकी ४०१ लाभार्थ्यांनी सदनिका स्वीकारली आहे. उर्वरित ४७० लाभार्थ्यांनी तात्पुरते देकारपत्र निर्गमित होण्यापूर्वीच सदनिका रद्द केली, तर काहींनी मुदतीत पर्याय निवडला नाही. त्यामुळे सदनिका रिक्त राहिल्याने 'पीएमआरडीए'ने दि. ८ जून २०२६ रोजी प्रवर्गनिहाय प्रतीक्षा यादी कार्यान्वित केली. एकूण ६५५ प्रतीक्षा यादीतील लाभार्थ्यांपैकी ३३० लाभार्थ्यांची नावे प्रवर्गनिहाय प्रतीक्षा यादीतून अंतिम मंजुरीनंतर विजयी म्हणून घोषित करण्यात आली आहेत. यामध्ये पेठ क्र. १२ आणि पेठ क्र. ३०-३२ मधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) व कमी उत्पन्न गट (एलआयजी) मधील विविध प्रवर्गांचा (सर्वसाधारण, अनुसूचित जाती व नवबौद्ध, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व दिव्यांग) समावेश आहे.

प्रतीक्षा यादीतून विजयी घोषित झालेल्या या ३३० लाभार्थ्यांना सदनिका स्वीकारण्यासाठी किंवा सोडून देण्यासाठी (सरेंडर) दि. ९ जून २०२६ ते १८ जून २०२६ या कालावधीत ऑनलाईन प्रणालीद्वारे पर्याय ('एक्सेप्ट' अथवा 'सरेंडर') उपलब्ध करून देण्यात आला आहे. लाभार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जमीन व मालमत्ता विभागाच्या सहआयुक्त पूनम मेहता यांनी केले आहे. तसेच, सदनिका स्वीकारल्यानंतर ४५ दिवसांत २५ टक्के रक्कम भरणे अपेक्षित आहे. गृहकर्ज घ्यायचे असल्यास १० टक्के रक्कम भरून नाहरकत प्रमाणपत्र दिले जाईल. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ६० दिवसांची मुदत देण्यात आलेली आहे.

### १८ जूनपर्यंत निर्णय आवश्यक

प्रतीक्षा यादीतून विजयी घोषित झालेल्या ३३० लाभार्थ्यांना ९ ते १८ जून २०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने सदनिका स्वीकारणे किंवा सरेंडर करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदनिका स्वीकारल्यानंतर ४५ दिवसांत २५ टक्के रक्कम भरावी लागणार असून गृहकर्ज घेणाऱ्यांना १० टक्के रक्कम भरल्यानंतर नाहरकत प्रमाणपत्र दिले जाणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ६० दिवसांची मुदत देण्यात आली आहे.



## भूमिका

**जून महिना म्हणजे आशा, अपेक्षा आणि नव्या सुरुवातींचा काळ. विशेषतः भारतासारख्या कृषिप्रधान देशात मान्सून हा केवळ ऋतू नसून अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसलेला असतो, तर सर्वसामान्य नागरिक पावसामुळे महागाई कमी होईल.**

# आशेला हूल, निराशेची चाहूल



पाण्याची समस्या सुटेल आणि दैनंदिन जीवन काहीसे सुसह्य होईल, अशी अपेक्षा बाळगून असतो. मात्र यंदाचा जून आशेपेक्षा अधिक चिंतेची चाहूल देणारा ठरत आहे.हवामान विभागाने मान्सूनचा वेग मंदावल्याचे संकेत दिले आहेत.

राज्यातील अनेक भागांत समाधानकारक पाऊस आणखी काही दिवस लांबू शकतो, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. परिणामी शेतकरी संभ्रमात सापडला आहे. पेरणीसाठी बियाणे, खते आणि कर्जाची व्यवस्था करूनही पाऊस नसल्याने त्याला प्रतीक्षा करावी लागत आहे.

शेतीवर आधारित ग्रामीण अर्थव्यवस्था या अनिश्चिततेमुळे मंदावली असून शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. दुसरीकडे शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकही वाढत्या महागाईच्या ओझ्याखाली दबला जात आहे. घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात झालेली वाढ ही त्याची ताजी उदाहरणे आहेत.

गेल्या काही महिन्यांत गॅसच्या किंमतीत झालेली वाढ थेट स्वयंपाकघराच्या बजेटवर परिणाम करणारी आहे. आधीच भाजीपाला, वीज, शिक्षण आणि आरोग्यावरील खर्च वाढत असताना गॅस दरवाढीने सामान्य कुटुंबांचे गणित अधिकच बिघडले आहे. सरकारकडून अर्थव्यवस्थेच्या वाढीचे आणि विकासाच्या मोठमोठ्या योजनांचे चित्र रंगवले जात आहे. गुंतवणूक, उद्योग आणि विकासाचे आकडे निश्चितच महत्त्वाचे आहेत; मात्र त्याचा लाभ सामान्य नागरिकांच्या जीवनात कितपत पोहोचतो, हा खरा प्रश्न आहे.

पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेची भाषा सर्वसामान्यांना समजत नसली तरी महागलेला सिलिंडर, वाढलेले वीजबिल आणि महाग झालेला भाजीपाला मात्र त्यांना रोज जाणवतो. पाऊस उशिरा आल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. पाणीटंचाई वाढेल, शेती उत्पादन घटेल आणि त्याचा थेट परिणाम बाजारातील दरांवर होईल.

भाजीपाला, धान्य आणि पशुखाद्य महागण्याची शक्यता निर्माण होईल. अशा वेळी महागाईचा सर्वाधिक फटका पुन्हा एकदा सर्वसामान्यांनाच बसणार आहे. यामुळे सरकारच्या संवेदनशीलतेचा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. नागरिकांनी संयम बाळगावा, काटकसर करावी आणि परिस्थिती समजून घ्यावी, अशी अपेक्षा नेहमी व्यक्त केली जाते. मात्र सरकारनेही जनतेच्या अडचणी ओळखून त्यांना दिलासा देणारी ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. केवळ योजनांच्या घोषणा किंवा विकासाची आकडेवारी पुरेशी नाही. शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या प्रत्यक्ष अडचणींवर उपाययोजना होणे गरजेचे आहे.

पावसाचा विलंब हा निसर्गाचा भाग असू शकतो; परंतु महागाईवर नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांना आधार देणे ही व्यवस्थेची जबाबदारी आहे. आज आकाशात ढग कमी आणि मनात चिंता अधिक आहे. अशा वेळी आभाळाने साथ दिली नाही तरी सरकारने साथ सोडू नये, हीच सर्वसामान्यांची रास्त अपेक्षा आहे.

## प्रासंगिक »

### खरं सत्य

**एका साधूला पितळेच्या धातूचे सोन्यात रूपांतर करण्याची कला अवगत होती. पण याचा उपयोग तो गरजुंना करण्यासाठीच करत होता. एकेदिवशी एक गरीब ब्राह्मण त्याच्याकडे आला.**

ब्राह्मणाकडील सोन्याचे भांडे पाहून सोनाराला संशय आला. चौकशी केल्यावर ब्राह्मणाने साधूने पितळेचे सोने करून दिल्याची घटना राजाला सांगितली. हे ऐकून राजाच्या मनातही ती विद्या शिकण्याचा लोभ निर्माण झाला.त्याने साधूला ती विद्या शिकविण्याची आज्ञा केली, पण साधूने नकार दिला. संतापलेल्या राजाने त्याला धमकी दिली. मात्र साधू आपल्या निर्णयावर ठाम राहिला. शेवटी राजाने वेशांतर करून साधूच्या आश्रमात राहण्यास सुरुवात केली. तो नम्रपणे त्याची सेवा करू लागला. राजाच्या सेवाभावाने प्रसन्न होऊन साधूने त्याला पितळेचे सोने करण्याची विद्या शिकवली. नंतर राजाने अभिमानाने ही गोष्ट सांगितली तेव्हा साधू म्हणाला, “महाराज, तुम्ही ही विद्या माझी सेवा करून मिळवली आहे, धमकी देऊन नाही. ज्ञान प्राप्त करण्यासाठी गुरुची कृपा आणि नम्रता आवश्यक असते.”

- तात्पर्य : ज्ञान सचोटीने प्राप्त होते, धमकावून नव्हे.

देशाच्या आर्थिक विकासाची चमकदार चित्रे रंगवली जात असताना वास्तव मात्र वेगळीच कथा सांगत आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालावर आधारित माजी नीती आयोग उपाध्यक्ष राजीव कुमार यांच्या लेखाने हे वास्तव पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

# प्रगतीच्या गजरात विषमतेची किंकाळी

विशेष म्हणजे ही टीका सरकारविरोधी गटातून नव्हे, तर सत्ताधाऱ्यांच्या धोरण प्रक्रियेशी जवळून संबंधित राहिलेल्या व्यक्तीकडून आली आहे.

अहवालानुसार, गेल्या तीन वर्षांत बँकांनी वितरित केलेल्या एकूण कर्जापैकी निम्म्याहून अधिक कर्ज फक्त ११ जिल्ह्यांमध्ये केंद्रित झाले आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि दिल्ली या तीन जिल्ह्यांनीच सुमारे ३० टक्क्यांहून अधिक पतपुरवठा घेतला.

दुसरीकडे शेकडो जिल्ह्यांना अत्यल्प कर्जवाटप झाले. तब्बल ३८१ जिल्ह्यांचा राष्ट्रीय पतपुरवठ्यातील वाटा केवळ ४.९ टक्के इतकाच आहे. ही आकडेवारी विकासातील तीव्र प्रादेशिक विषमता स्पष्ट करते. बँक ठेवींमध्येही असेच चित्र दिसते. देशातील निम्म्याहून अधिक ठेवी फक्त १७ जिल्ह्यांतून येतात.

याचा अर्थ आर्थिक व्यवहार, गुंतवणूक, उद्योग आणि रोजगारनिर्मिती यांचा केंद्रबिंदू अत्यंत



मर्यादित भूभागात अडकला आहे. उर्वरित देश अजूनही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूरच आहे. गेल्या दशकात ‘जनधन योजना’, ‘मेक इन इंडिया’ आणि डिजिटल व्यवहारांच्या यशाच्या घोषणा सातत्याने करण्यात आल्या. कोट्यवधी नवीन बँक खाती उघडली गेली, यूपीआय व्यवहारांमध्ये विक्रमी वाढ झाली.

मात्र आर्थिक विकासाचा पाया अधिक व्यापक आणि समतोल झाला का, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. खाते उघडणे आणि अर्थव्यवस्थेत सक्रिय सहभाग वाढणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. या अहवालातून आणखी एक गंभीर बाब समोर येते.

देशाच्या आर्थिक प्रगतीचा मोठा भार महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि काही प्रमाणात गुजरात या राज्यांवर आहे. उत्तर आणि मध्य भारतातील अनेक राज्ये अजूनही विकासाच्या शर्यतीत मागे आहेत.

एवढेच नव्हे तर विकसित राज्यांमध्येही मोठी अंतर्गत विषमता दिसून येते. महाराष्ट्रातील मुंबई आणि गडचिरोली यांतील आर्थिक दरी हे त्याचे ठळक उदाहरण आहे. खरे तर ही समस्या नवीन नाही.

मात्र विकासाच्या दाव्यांमागील वास्तव आता सत्ताधाऱ्यांशी संबंधित अर्थतज्ज्ञही मांडू लागले आहेत, ही बाब अधिक महत्त्वाची आहे. याचा अर्थ आर्थिक वाढीचे आकडे आणि प्रत्यक्ष विकास यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे.

देशाचा विकास केवळ काही शहरांपुरता मर्यादित न राहता सर्व जिल्ह्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. अन्यथा विकासाची चमक काही भागांत दिसेल; पण उर्वरित भारत मात्र अंधारातच राहील.

## ।। अभंगवाणी ।।



शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी ।
मज आणि हरी वियोग तों ॥१॥

प्रसंगीं या नाहीं देहाची भावना ।
तेथें या वचना कोण मानी ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाणे-घोडबंदर मार्गावरील प्रवास सुसाट!

## गायमुख ते फाउंटन हॉटेल बोगदा आणि भाईंदर उन्नत पुलाला ग्रीन सिग्नल

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी ठाणे- घोडबंदर रस्त्यावरील गायमुख ते फाउंटन हॉटेल भुयारी मार्ग व फाउंटन हॉटेल ते भाईंदर उन्नत पुलामुळे या मार्गावरील प्रवास आता सुसाट होणार आहे. या भागातील पायाभूत सुविधांचे प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याने वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ आणि वेगवान होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला आहे.**



मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची मंत्रालयात आज मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील विविध वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी २२ हजार ६११ कोटी रुपयांच्या प्रस्तावांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

गायमुख ते फाउंटन हॉटेल दरम्यान 5.86 किलोमीटर लांबीचा सहा पदरी भुयारी मार्ग आणि फाउंटन हॉटेल ते भाईंदर दरम्यान 9.58 किलोमीटर लांबीचा सहा पदरी उन्नत पूल उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे पश्चिम मुंबईला ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, पनवेल; तसेच राष्ट्रीय महामार्ग-48च्या दृष्टीने अधिक वेगवान आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. हा भुयारी मार्ग टीबीएम तंत्रज्ञानाद्वारे उभारण्यात येणार असून, त्याचा व्यास 14 मीटर असेल. सुमारे पाच वर्षांत हा बोगदा पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तर वसई खाडीला समांतर जाणाऱ्या उन्नत पुलावर ताशी 100 किलोमीटर वेगाने वाहतूक शक्य होणार आहे.

घोडबंदर मार्गावरील वाढती वाहतूक आणि जड वाहनांचा ताण कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असून विशेषतः ठाणे व गुजरातच्या दिशेने जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' मॉडेलद्वारे करण्यात येणार आहे. केंद्र व राज्य शासनाकडून 'व्हायबिलिटी गॅप फंडिंग' उपलब्ध करून देण्यात येणार आहे; तसेच प्रकल्प परिसरात एमएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी मान्यता दिली.


### नवी मुंबई मेट्रोला गती

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग 1ए (सागर संगम ते सीबीडी बेलापूर) आणि मेट्रो मार्ग 2 (पेंधर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-4) या प्रकल्पास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. या प्रकल्पामुळे सागर संगम ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा एकूण 28 किलोमीटरचा सलग मेट्रो मार्ग उपलब्ध होणार आहे. या विस्तारामध्ये मार्ग 1ए वर दोन आणि मार्ग 2 वर अकरा स्थानकांचा समावेश आहे. भविष्यात दररोज सुमारे 12 लाख प्रवाशांना या मेट्रो सेवेचा लाभ मिळणार आहे.

# सिंधुदुर्गचा बाळा राऊळ राज्यात पहिला, ऐश्वर्या फडतरे महिलांमध्ये प्रथम

**महाईन्यूज । नागपूर**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे २१ सप्टेंबर, २०२५ रोजी मुंबईसह औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक व पुणे जिल्हाकेंद्रांवर घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२४ मधील लिपिक-टंकलेखक या संवर्गातील एकूण ६० नियुक्ती प्राधिकारी कार्यालयांचा अंतिम निकाल दिनांक ०८ जून, २०२६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण ९७५ उमेदवार विषयांकित संवर्गाकरिता शिफारसपात्र ठरत आहेत. सदर संवर्गातून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राऊळ बाळा नारायण हे राज्यातून व मागासवर्गवारीमधून प्रथम आले आहेत. तर महिला वर्गवारीमधून सातारा जिल्ह्यातील फडतरे ऐश्वर्या सुरेश या राज्यात प्रथम आल्या आहेत.**




उमेदवारांच्या माहितीकरिता विषयांकित संवर्गाची अंतिम गुणवत्ता यादी व नियुक्ती प्राधिकारीनिहाय स्वतंत्र ६० अंतिम शिफारस याद्या आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. न्यायिक प्रकरणाच्या अनुषंगाने इ.मा.व. (खेळाडू) या वर्गवारीतील एका पदाचा निकाल राखून ठेवण्यात आला आहे. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरत असलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

प्रस्तुत निकालानुसार दिव्यांग, अनाथ, खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी इत्यादींसाठी तसेच अन्य आरक्षित पदांवर शिफारसपात्र उमेदवारांची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडून तपासणी करण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. न्यायालयात/मा.न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयांच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

### प्रतीक्षा यादी राहणार

प्रस्तुत संवर्गाकरिता प्रतीक्षायादी ठेवण्यात येईल. तथापि, पसंतीक्रमानुसार एकदा शिफारस केल्यानंतर व नियुक्ती स्वीकारल्यानंतर, संबंधितांचा इतर नियुक्ती प्राधिका-यांचा पसंतीक्रम संपुष्टात येईल. प्रतीक्षायादीतून शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवाराचा पसंतीक्रम विचारात घेतला जाणार नाही. तसेच आयोगामार्फत मूळ शिफारस यादीमधून शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारास प्रस्तुत लिपिक-टंकलेखक संवर्गातील नियुक्तीसाठी अन्य नियुक्ती प्राधिका-याचा पुन्हा दावा करता येणार नाही. शासनाच्या मागणीनुसार सदर संवर्गातील प्रतीक्षायादीवरील उमेदवारांच्या शिफारशी आयोगामार्फत करण्यात येतील.

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये भीषण रक्तपात!

## आंदोलक आणि पाक जवानांमध्ये चकमक; ३० जणांचा मृत्यू, २०० जखमी

**महाईन्यूज । काश्मीर**

**पाकव्याप्त काश्मीरमध्ये आंदोलनकर्ते आणि पाकिस्तानी सुरक्षा दलाच्या जवानांमध्ये झालेल्या चकमकीत सुमारे ३० जणांचा मृत्यू झाला असून, २०० नागरिक जखमी झाले आहेत. जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीने पाकव्याप्त काश्मीरमधील आर्थिक आणि राजकीय समस्यांवरुन सरकारविरोधात काढलेला मोर्चा अवैध ठरवत बंदी घातली. यानंतर आंदोलनकर्ते आणि पाकिस्तानी जवानांमध्ये चकमक झाली.**





कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित करत जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीचा मोर्चा स्थानिक प्रशासनाने बेकायदेशीर ठरवत त्यावर बंदी घातली. गेल्या आठवड्यात शुक्रवारी रात्री रावलकोट भागात एका व्यापाऱ्याची गोळी मारुन हत्या करण्यात आली, प्रशासनाकडूनच ही हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर आंदोलक रस्त्यावर उतरले होते. रविवारी रात्री जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीच्या आंदोलकांनी रुग्णालय आणि शवगराच्या बाहेर मोठ्या संख्येने गर्दी केली. "पोलिसांनी आंदोलकांवर केलेल्या गोळीबारात सहा आंदोलकांचा मृत्यू झाला", अशी माहिती पूंछ विभागाचे पोलिस अधीक्षक सरदार वाहिद खान यांनी रॉयटर्सला दिली आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, आंदोलकांना पांगवण्यासाठी सुरक्षा दलाच्या जवानांनी प्रयत्न केला. पण, आंदोलकांनी रायफल, पेट्रोल बॉम्ब आणि विविध शस्त्रांनी लक्ष्य केलं, असे पोलिसांनी सांगितले. पाकव्याप्त काश्मीरमध्ये वाढती महागाई, वीजेचे बिल, वाढती बेरोजगारी आणि राजकीय हक्क यावरुन नागरिक रस्त्यावर उतरल्याचे वृत्त ट्रिब्युनने दिले आहे. जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीच्या नेतृत्वाखाली मंगळवारी आंदोलक रस्त्यावर उतरल्यानंतर प्रशासनाने त्यांच्यावर कारवाई करण्यास सुरुवात केल्यानंतर आंदोलक, पोलिस आणि जवानांमध्ये चकमक उडाली, असे या बातमीत पुढे म्हटले आहे.

### विविध व्हिडीओ समोर

सरकारविरोधी आंदोलनाचे विविध व्हिडीओ आता समाज माध्यमांवर व्हायरल होऊ लागले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडिओंमध्ये बरनाला, भिमबर आणि मीरपूर येथे आंदोलकांची मोठी गर्दी जमलेली दिसत आहे. मुझफ्फराबादमध्ये सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आंदोलकांवर अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या. जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीचे कार्यकर्ते आणि पाकिस्तानी सुरक्षा दलांमध्ये झालेल्या संघर्षानंतर तणाव वाढल्याने शहरातील बाजारपेठा बंद असल्याचे इतर फुटेजमध्ये दिसत आहे.

### ३० जणांचा मृत्यू

विविध माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, या चकमकीत जवळपास ३० जणांचा मृत्यू झाला असून, यात सामान्य नागरिक आणि सुरक्षा दलातील जवानांचा देखील समावेश आहे. मृतांची संख्या अधिक असण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. सुरक्षा दलाच्या जवानांनी आंदोलकांवर गोळीबार केल्याचा आरोप देखील केला जात आहे. दरम्यान, यानंतर पाकिस्तानने या भागात अधिक सुरक्षा तैनात केली असल्याची माहिती समोर आली आहे.

---

# 'फितना अल-हिंदुस्तान' वरून संयुक्त राष्ट्रात भारताने पाकिस्तानला फटकारले

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पाकिस्तान सरकारने एजन्सींना काही विशिष्ट गटांचा उल्लेख 'फितना अल-हिंदुस्तान' असा करण्याचे आदेश दिले आहेत, या आदेशाचा भारताने तीव्र शब्दात निषेध करत पाकिस्तानच्या लष्करी उठावाचा देखील पर्दाफाश केला. संयुक्त राष्ट्रातील भारताचे स्थायी प्रतिनिधी राजदूत हरीश पर्वथनेनी यांनी पाकिस्तानला कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले. पाकिस्तान कशाप्रकारे चुकीच्या आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीला धार्मिक रंग देत आहे हे देखील पर्वथनेनी यांनी अधोरेखित केले.**




"हा पाकिस्तानच्या छुप्या लष्करी प्रभावातून चालवल्या जाणाऱ्या द्वेषाचा संघटित परिणाम आहे. पाकिस्तानी नागरिकांना भारताविरुद्ध कायम शत्रुत्वाच्या छायेत ठेवणे, हाच यामागचा उद्देश आहे. यामुळे त्यांना सत्ता आणि देशाच्या संसाधनांवर स्वतःचे नियंत्रण कायम ठेवता येईल. शिवाय, नागरिकांचे लक्ष देशातील मुख्य राजकीय आणि आर्थिक समस्यांवरून विचलित करता येईल," असे हरीश पर्वथनेनी पाकिस्तानला फटकारताना म्हणाले.

पाकिस्तान सरकारने २०२५ मध्ये बलुचिस्तान प्रांतात सक्रिय असलेल्या सर्व दहशतवादी गटांना आणि संघटनांना अधिकृतपणे 'फितना अल-हिंदुस्तान' म्हणून घोषित केले होते. दरम्यान, संयुक्त राष्ट्रात भारताने पाकिस्तानच्या या निर्णयाचा स्पष्ट शब्दांत धिक्कार करत धार्मिक शब्दांच्या आडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती असल्याचे सांगत ती फेटाळून लावली. भारताने यावेळी अफगाणिस्तानवर पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या हवाई हल्ल्यांचा देखील तीव्र शब्दात निषेध केला. निष्पाप नागरिकांची हत्या करणे, त्यांना अपंग करणे किंवा अनाथ करणे याला दहशतवादविरोधी कारवाई म्हणता येत नाही, असे पर्वथनेनी म्हणाले.

दरम्यान, "पाकिस्तानला आपल्या अपयशाचे खापर शेजारील देशांवर फोडण्याची जुनी सवय आहे. त्यांचे प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाहीत", असे पर्वथनेनी म्हणाले.


### लष्कराकडून सत्तापालट

भारताने पाकिस्तानाला फटकारताना तेथील लष्करी सत्तापालटाचा संदर्भ दिला. पर्वथनेनी यांचा रोख असीम मुनीर यांच्याकडे होता. मुनीर यांची पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी पहिले 'चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संरक्षण क्षेत्रातील आदेशांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आणि जलद निर्णय घेण्यासाठी २७ व्या घटनादुरुस्तीच्या मंजुरीनंतर सीडीएफ हे पद निर्माण करण्यात आले आहे.

# जान्हवीचं अंगप्रदर्शन.!




राम चरण अभिनीत 'पेद्दी' हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर अभिनेत्री जान्हवी कपूरच्या भूमिकेची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपटातील तिच्या सादरीकरणावर अनेक प्रेक्षक आणि समीक्षकांनी नाराजी व्यक्त केली असून, दिग्दर्शक बुची बाबू सना आणि चित्रपटाच्या निर्मात्यांवर टीकेची झोड उठली आहे. अनेकांच्या मते, जान्हवीच्या पात्राला पुरेशी खोली न देता तिचा वापर केवळ दृश्य आकर्षणासाठी करण्यात आला आहे. या वादात आता प्रसिद्ध गायिका सुमंगली अरियानायगम यांनीही उडी घेतली आहे. त्यांनी इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे चित्रपटाच्या टीमवर निशाणा साधत अभिनेत्रीच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये सुमंगली यांनी लिहिले की, "एका प्रभावशाली पुरुषप्रधान वातावरणात ही कथा लिहिली गेली, मात्र जान्हवी कपूरच्या पात्राला केवळ कॅमेऱ्यासाठी दाखवण्याचे साधन बनवण्यात आले. तिच्या व्यक्तिरेखेचा स्वतंत्र विचार न करता तिला फक्त काही विशिष्ट दृश्यांपुरते मर्यादित ठेवण्यात आले. मानवी प्रतिष्ठा आणि पात्रांबद्दलचा आदर म्हणजे काय हे निर्मात्यांना निश्चितच माहिती आहे. मात्र, या चित्रपटात त्या मूल्यांचे प्रतिबिंब दिसत नाही." सुमंगली यांची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, अनेकांनी त्यांच्या मताला समर्थन दिले आहे. 'पेद्दी' मध्ये जान्हवी कपूरने 'अचियम्मा' ही भूमिका साकारली आहे. मात्र, अनेक प्रेक्षकांचा आरोप आहे की चित्रपटात तिच्या अभिनय कौशल्यावर किंवा व्यक्तिरेखेच्या विकासावर भर न देता कॅमेऱ्याचा फोकस तिच्या शारीरिक आकर्षणावर अधिक ठेवण्यात आला आहे. काही समीक्षकांच्या मते, चित्रपटातील अनेक दृश्ये आणि फ्रेम्स अभिनेत्रीच्या व्यक्तिरेखेपेक्षा तिच्या दिसण्यावर अधिक केंद्रित असल्याचे जाणवते. तसेच काही प्रसंगांबाबतही सोशल मीडियावर चर्चा रंगली असून, त्या दृश्यांमुळे महिलांच्या सादरीकरणाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. 'पेद्दी' प्रदर्शित झाल्यानंतर सुरू झालेला हा वाद अद्याप शांत झालेला नाही. एका बाजूला चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर प्रतिसाद मिळत असताना, दुसरीकडे जान्हवी कपूरच्या भूमिकेच्या मांडणीवरून मनोरंजन क्षेत्रातील व्यक्तींकडूनही टीका होत आहे.



# नोरा फतेहीच्या नव्या गाण्याची कमाल

अभिनेत्री आणि नृत्यांगना नोरा फतेही पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. फीफा वर्ल्ड कप २०२६साठी तयार करण्यात आलेले तिचे नवीन गाणे 'Siir Siir' नुकतेच प्रदर्शित झाले असून या गाण्याला प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. रिलीज झाल्यानंतर अवघ्या १८ तासांत या गाण्याला ६.१ दशलक्ष म्हणजेच ६१ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. 'Siir Siir' हे गाणे फीफा वर्ल्ड कप २०२६च्या अधिकृत संगीत प्रकल्पाचा भाग आहे. हे गाणे स्पर्धेच्या अधिकृत अल्बममध्येही समाविष्ट करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी जगभरातील विविध संगीत परंपरा आणि संस्कृतींशी संबंधित कलाकारांना एकत्र आणण्यात आले आहे. प्रसिद्ध संगीत निर्माता संजय आणि फ्रेंच गायक वेजड्रीम यांच्या सहकार्याने हे गाणे तयार करण्यात आले आहे. या गाण्याच्या यशामुळे नोरा फतेहीच्या चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सोशल मीडियावरही या गाण्याची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. अनेकांनी या गाण्याचे कौतुक करत ते फीफाच्या आतापर्यंतच्या सर्वोत्तम गाण्यांपैकी एक असल्याचे म्हटले आहे.

# नाही सांगूनही प्रत्येक सीनमध्ये किस..



सलमान खानच्या 'वीर' चित्रपटातून पदार्पण करणारी झरीन खान गेल्या काही काळापासून रुपेरी पडद्यापासून दूर असली, तरी माध्यमाशी बोलताना धक्कादायक खुलाशामुळे ती पुन्हा चर्चेत आली आहे. 'हेट स्टोरी ३' या चित्रपटानंतर एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये (टाईपकास्ट) अडकणे टाळण्यासाठी तिने 'अक्सर २' चित्रपट स्वीकारला होता. मात्र, दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी चित्रपटात कोणतेही बोल्ड सीन्स नसतील असे आश्वासन देऊनही सेटवर फसवणूक केल्याचा खळबळजनक आरोप झरीनने केला आहे. झरीनने सांगितले की, 'हेट स्टोरी ३' नंतर तिला तशाच प्रकारच्या बोल्ड भूमिकांच्या ऑफर्स येत होत्या. तिला स्वतःला एकाच साच्यात अडकवून घ्यायचे नव्हते; त्यामुळे 'अक्सर २' साठी होकार देण्यापूर्वी तिने दिग्दर्शक अनंत महादेवन यांच्याकडून चित्रपटात तिची भूमिका इंटिमेट असणार नाही, याची पूर्ण खात्री करून घेतली होती. पहिल्या 'अक्सर' चित्रपटाच्या हिट फ्रेंचायजीचा भाग होण्यास ती उत्सुक होती. दिग्दर्शकानेही तिला "आपण हेट स्टोरी बनवत नाही आहोत," असे सांगत बोल्ड सीन्स नसल्याचे स्पष्ट केले होते. शूटिंगदरम्यान आलेल्या वाईट अनुभवावर बोलताना झरीन म्हणाली, "शूटिंग सुरू झाल्यावर मला प्रत्येक दुसऱ्या सीनमध्ये किस करायला सांगितले जात होते. मला हे सगळे खूप विचित्र वाटले. मी असे म्हणणार नाही की मी सती सावित्री आहे, त्यामुळे मी हे करणार नाही. पण मी आधी जो चित्रपट केला होता, त्यांनी मला चित्रपटात असे सीन्स असतील याची आधीच स्पष्ट कल्पना दिली होती. मात्र इथे अगदी उलट घडले. बोल्ड सीन्स नसतील असे सांगून सेटवर गेल्यावर प्रत्येक वेळी तसे सीन्स समोर आणले गेले, त्यामुळे मी त्याला विरोध केला."

# मैदानानंतर मार्केटवर ‘कोहली’चे साम्राज्य!

## ३५४२ कोटींच्या ब्रँड व्हॅल्यूसह सर्वात मौल्यवान सेलिब्रिटी; विराटसमोर शाहरुखही पडला फिका

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतीय क्रिकेटचा ‘किंग’ म्हणून ओळखला जाणारा विराट कोहली मैदानावरील विक्रमांनंतर आता जाहिरात आणि व्यवसाय क्षेत्रातही नवा इतिहास रचत आहे. क्रिकेटमधील आपल्या दैदिप्यमान कारकिर्दीच्या जोरावर कोहलीने ब्रँड मूल्याच्या बाबतीत देशातील अनेक दिग्गजांना मागे टाकत भारतातील सर्वात मौल्यवान सेलिब्रिटी म्हणून मानाचे स्थान पटकावले आहे.**



फॉर्च्युन इंडिया आणि जागतिक ब्रँड सल्लागार संस्था इंटरब्रँड यांनी देशातील २५ सर्वाधिक मूल्यवान सेलिब्रिटींवर केलेल्या ताज्या अभ्यासातून ही माहिती समोर आली आहे.

या अहवालानुसार, विराट कोहलीची ब्रँड व्हॅल्यू तब्बल ३,५४२ कोटी रुपये इतकी असून तो भारतातील सर्वाधिक मूल्यवान व्यक्तिमत्त्वांच्या यादीत अव्वल स्थानावर विराजमान झाला आहे. विशेष म्हणजे, या शर्यतीत त्याने बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान तसेच भारतीय क्रिकेटचा देव मानल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकर यांनाही मोठ्या फरकाने मागे टाकले आहे.

या विशेष अहवालातील अव्वल १० सेलिब्रिटींच्या यादीत तीन क्रिकेटपटू आणि सात चित्रपटसृष्टीतील कलाकारांचा समावेश आहे. विराट कोहलीनंतर दुसऱ्या क्रमांकावर शाहरुख खान आहे. जागतिक स्तरावर भारताची ओळख निर्माण करणारी अभिनेत्री प्रियंका चोप्रा जोनास तिसऱ्या स्थानावर असून ती महिला सेलिब्रिटींमध्ये सर्वाधिक मूल्यवान ठरली आहे. चौथ्या क्रमांकावर भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी असून पाचव्या स्थानी बॉलिवूडचा युवा स्टार रणवीर सिंह आहे.

या यादीत पुढे अक्षय कुमार, अमिताभ बच्चन, सचिन तेंडुलकर, आलिया भट्ट आणि दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार अल्लू अर्जुन यांचा समावेश आहे. त्यामुळे मनोरंजन आणि क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांचा या यादीवर मोठा प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.

अव्वल १० च्या बाहेर संपूर्ण टॉप-२५ यादीकडे नजर टाकल्यास यात दीपिका पदुकोणने ११वे स्थान पटकावले आहे. तर दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका मंदाना १७व्या क्रमांकावर आहे. याशिवाय अभिनेत्री कृती सेनन, ‘लेडी सुपरस्टार’ म्हणून ओळखली जाणारी नयनतारा आणि भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मानधना यांनाही या प्रतिष्ठित यादीत स्थान मिळाले आहे.

### सेलिब्रिटींची ब्रँड व्हॅल्यू नेमकी कशी ठरवली जाते?

सेलिब्रिटींची ब्रँड व्हॅल्यू नेमकी कशी ठरवली जाते, याबाबत अनेकांच्या मनात उत्सुकता असते. सोशल मीडियावरील फॉलोअर्सची संख्या, वार्षिक उत्पन्न किंवा चित्रपटांच्या बॉक्स ऑफिसवरील यश यावरच ब्रँड मूल्य अवलंबून असते, असा सर्वसाधारण समज आहे. मात्र इंटरब्रँड्च्या या संशोधनात अधिक व्यापक आणि वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

### ब्रँड ताकदीचे मूल्यमापन करण्यासाठी महत्वाचे निकष

या अभ्यासामध्ये सेलिब्रिटींच्या ब्रँड ताकदीचे मूल्यमापन करण्यासाठी सहा महत्त्वाच्या निकषांचा आधार घेण्यात आला. त्यामध्ये विश्वासार्हता, लोकांशी असलेले भावनिक नाते, लोकप्रियता, सामाजिक जबाबदारी, ब्रँडची एकूण ताकद आणि समाजावर पडणारा प्रभाव या घटकांचा समावेश होता. या सर्व पैलूंच्या सखोल विश्लेषणातून सेलिब्रिटींची वास्तविक ब्रँड किंमत निश्चित करण्यात आली. त्यामुळे ही यादी केवळ प्रसिद्धी किंवा कमाईवर आधारित नसून व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण प्रभावाचे प्रतिबिंब मानली जात आहे.

# एम्बाप्पेचा करिष्मा अन् राखीव फळीची ताकद! जगज्जेतेपदासाठी 'फ्रेंच आर्मी' सज्ज

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**फुटबॉल विश्वात फ्रान्सचा संघ पुन्हा चर्चेत आला आहे. आगामी फिफा (FIFA) विश्वचषकासाठी निवडण्यात आलेल्या फ्रेंच संघ हा कागदावरच नाही तर मैदानावरही प्रचंड मजबूत मानला जात आहे. त्यामुळे हा संघ स्पर्धेतील विजेतेपदाचा सर्वात मोठा दावेदार आहे. मागील दोन विश्वचषकांमध्ये फ्रान्सने दमदार कामगिरी केली होती. ज्यामुळे यंदाही त्यांच्याकडून विजेतेपदाची मोठी अपेक्षा आहे.**



2010 चा विश्वचषक फ्रेंच फुटबॉलसाठी अत्यंत वादग्रस्त आणि संकटपूर्ण ठरला होता. त्या काळातील संघातील अंतर्गत संघर्ष, व्यवस्थापनातील गोंधळ आणि खेळाडूंच्या वर्तनामुळे फ्रेंच फुटबॉल मोठ्या टीकेचा विषय ठरला. मात्र त्यानंतर 2012 मध्ये प्रशिक्षक डिडिएर डेशॅम्प्स यांच्याकडे संघाची धुरा आली आणि फ्रेंच फुटबॉलचा संपूर्ण चेहरामोहरा बदलला.

गेल्या 12–14 वर्षांत फ्रान्सने तरुण प्रतिभेला संधी देत जगातील सर्वात मजबूत फुटबॉल इकोसिस्टम उभारली आहे. क्लेअरफोंटेन अकादमी, लीग 1 क्लब्सच्या मजबूत अकादमी आणि सतत निर्माण होणारी प्रतिभा यामुळे फ्रान्स हा फुटबॉलचे ‘टॅलेंट हब’ म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.

युगो लॉरिसच्या निवृत्तीनंतर फ्रान्सच्या गोलकीपिंगची धुरा माईक मिन्यो यशस्वीपणे सांभाळत आहे. एसी मिलानचा हा गोलकीपर उत्कृष्ट शॉट-स्टॉपर असून तो संघाचा मुख्य गोलकीपर असेल. त्याच्या सोबतीला ब्रस सांबा आणि रॉबिन रिसर हे पर्याय उपलब्ध आहेत. बचाव फळीचा विचार केल्यास फ्रान्सकडे जागतिक दर्जाचे खेळाडू आहेत.

सध्याच्या घडीला जगातील सर्वोत्तम सेंटर बॅक्सपैकी एक. त्याची अष्टपैलू शैली आणि 'वन-ऑन-वन' डिफेन्स संघासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. सलीबाच्या पाठीच्या दुखापतीने डेशॅम्प्स यांची चिंता वाढवली आहे. तो वेदनाशामक औषधे (Painkillers) घेऊन खेळण्याची शक्यता असून, विश्वचषकानंतर त्याच्यावर शस्त्रक्रिया होऊ शकते. तो तंदुरुस्त असल्यास उपामेकानो-सलीबा ही या विश्वचषकातील सर्वोत्तम बचावात्मक जोडी ठरेल. डावा बॅक आणि सेंटर बॅक अशा दोन्ही भूमिका बजावू शकणारा हा खेळाडू संघाला उत्तम संतुलन देतो. इब्राहिमा कोनाटे आणि मॅक्सिन्स लवाक यांच्या रूपाने दर्जेदार बॅकअप उपलब्ध आहेत.

ज्युल्स कुंडे याचा बार्सिलोनासोबतचा फॉर्म चढ-उताराचा राहिला आहे. उजव्या बाजूला मालो गुस्तो 'वन-ऑन-वन' बचावात काहीसा कमकुवत ठरतो. डाव्या बाजूला थिओ हर्नांडिस हा सौदी लीगमध्ये गेल्यानंतर त्याच्या मैदानाबाहेरील जीवनशैलीमुळे चर्चेत आहे, तरीही ९०% तंदुरुस्तीसह तो घातक ठरू शकतो. त्याच्या सोबतीला ॲस्टन व्हिलाचा अनुभवी ल्युका डीन सज्ज आहे.

### संभाव्य प्लेइंग ११

एडुआर्डो कामाव्हिंगा आणि ख्रिस्तोफर एनकुंकू यांसारख्या मोठ्या खेळाडूंना संघात जागा न मिळणे, हीच फ्रान्सच्या संघाची खोली दर्शवते. १९९४ ते २००२ दरम्यान सलग तीन फायनल खेळणाऱ्या ब्राझीलचा इतिहास फ्रान्ससमोर आहे. गेल्या वेळच्या फायनलमधील पराभवाचा वचपा काढून फ्रान्स पुन्हा एकदा जगज्जेतेपदाचा मुकुट परिधान करण्यास सज्ज दिसत आहे. माईक मिन्यो (गोलकीपर), ज्युल्स कुंडे, दायो उपामेकानो, मॅक्सिन्स लवाक, थिओ हर्नांडिस, ओरेलियन चुआमेनी, एंगोलो कान्ते, डेजरे ड्युए, मायकेल ओलिसे, उस्मान डेंबेले, किलियन एम्बाप्पे (कर्णधार).

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
। बुधवार ।
दि. 10 जून 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# अनधिकृत बांधकामांबाबत कोणतीही तडजोड नाही

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'क' व 'फ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत चिखली, कुदळवाडी आणि पवारवस्ती परिसरातील अनधिकृत बांधकामांवर आज महापालिका प्रशासनाने धडक कारवाई केली. कड़क पोलीस बंदोबस्तात राबविण्यात आलेल्या या मोहिमेत जवळपास २८००१ चौ. फूट क्षेत्रफळाची ११ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

सदर कारवाई मा. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, मा. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, पोलीस उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी सह शहर अभियंता (बांधकाम परवानगी, विद्युत), उप आयुक्त, सहाय्यक आयुक्त, सर्व क्षेत्रिय अधिकारी, कार्यकारी अभियंता (बांधकाम परवानगी) यांसह इतर कार्यकारी अभियंता (विद्युत, स्थापत्य) उपस्थित होते.

या मोहिमेत महापालिकेच्या अभियांत्रिकी विभागाचे १२ कार्यकारी अभियंता, ३२ उप अभियंता, १८ कनिष्ठ अभियंता आणि ४२ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीट निरीक्षक) सहभागी झाले होते. तसेच वीज वितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी देखील सहभागी झाले होते. कारवाई दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी आणि जवळपास १५० एम.एस.एफ जवानांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. तसेच २२ पोकलेन, २६ जेसीबी आणि १२० मजुरांच्या सहाय्याने ही बांधकामे हटवण्यात आली. खबरदारीचा उपाय म्हणून घटनास्थळी ४ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.


> शहरातील अनधिकृत बांधकामांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करणे ही प्रशासनाची जबाबदारी असून अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे हे शहरातील नियोजित व शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत बांधकामांना प्रशासनाकडून अभय दिले जाणार नाही. शहरातील पायाभूत सुविधा, सुरक्षितता आणि कायद्याचे पालन अबाधित राखण्यासाठी अशा कारवाया पुढेही सातत्याने राबविण्यात येतील. नागरिकांनी बांधकाम करण्यापूर्वी सर्व आवश्यक परवानग्या घेऊनच पुढील कार्यवाही करावी.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी,**
> **आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**




D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*



*UG/PG Programs*
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp




CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# अण्णासाहेब मगर बँकेला 'भारतरत्न सहकारिता'

## नंदूशेठ लांडे यांना 'आदर्श चेअरमन' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**'भारत को-ऑपरेटिव्ह बँकिंग संस्थे'च्या वतीने लखनौ येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण शिबिरात पिंपरी-चिंचवडमधील सहकार क्षेत्राचा मोठा गौरव झाला आहे. भोसरी येथील 'अण्णासाहेब मगर सहकारी बँके'ला अत्यंत प्रतिष्ठेचा 'भारत रत्न सहकारिता' (उत्कृष्ट अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक) पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.**






याच सोहळ्यात बँकेच्या प्रगतीत मोलाचे योगदान देणारे अध्यक्ष नंदूशेठ विठोबा लांडे पाटील यांना या वर्षीचा 'आदर्श चेअरमन' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. बँकेला राष्ट्रीय पातळीवर एकाच वेळी दोन सर्वोच्च बहुमान मिळाल्यामुळे सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लखनौ येथील या विशेष प्रशिक्षण शिबिरामध्ये देशभरातील तब्बल ४६ नामांकित सहकारी बँकांनी सहभाग घेतला होता. 'बी.एन.सी.' आणि 'बँकर' यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतकूप' अंतर्गत या राष्ट्रीय पुरस्कारांची निवड करण्यात आली होती. बँकेच्या वतीने पदाधिकारी आणि संचालकांनी मान्यवरांच्या हस्ते हे दोन्ही मानाचे सन्मानचिन्ह स्वीकारले.

या महत्त्वपूर्ण प्रशिक्षण शिबिरात आणि पुरस्कार सोहळ्यात बँकेचे संचालक गणेश पवळे, संतोष भांगरे, रामदास काळजे, राजू सस्ते तसेच बँकेचे व्यवस्थापक माणिक येळवंडे प्रामुख्याने सहभागी झाले होते. या शिबिरात उपस्थित सर्व शिबिरार्थींना सहकार, आधुनिक व्यवस्थापन आणि बँकिंग क्षेत्रातील विविध विषयांवर राष्ट्रीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सहकारी बँकिंग अधिक डिजिटल आणि सक्षम करण्यासाठीच्या नव्या संकल्पनांवर सविस्तर चर्चा झाली.

अण्णासाहेब मगर सहकारी बँकेला मिळालेल्या या राष्ट्रीय बहुमानाबद्दल बँकेच्या सर्व शाखांमधून, खातेदारांकडून आणि राजकीय तसेच सहकार क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुकाचा वर्षाव होत असून लांडे पाटील यांचे अभिनंदन केले जात आहे.

### हा दुहेरी सन्मान ग्राहकांच्या विश्वासाचे फळ

या ऐतिहासिक दुहेरी यशाबद्दल आनंद व्यक्त करताना बँकेचे अध्यक्ष नंदूशेठ विठोबा लांडे पाटील म्हणाले, "हा मिळालेला दुहेरी सन्मान म्हणजे बँकेचे सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी आणि मुख्यत्वे आमच्या लाखो ग्राहकांच्या दृढ विश्वासाचे फळ आहे. 'भारत रत्न सहकारिता' सारख्या राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च पुरस्काराने आमच्या बँकेच्या पारदर्शक कामाची दखल घेतली गेल्यामुळे, भविष्यात ग्राहकांना अधिक सक्षम आणि आधुनिक सेवा देण्यासाठी आम्हाला मोठी प्रेरणा मिळाली आहे. "यापुढेही विश्वास, पारदर्शकता आणि उत्कृष्ट सेवांच्या बळावर सहकार क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करण्यासाठी बँक कटिबद्ध राहील"

## न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव येथे नवीन शैक्षणिक वर्षाचे उत्साहात स्वागत!

**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**उन्हाळी सुट्ट्या संपल्यानंतर आजपासून नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ला अतिशय उत्साही आणि आनंदी वातावरणात सुरुवात झाली. येथील प्रसिद्ध 'न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव' मध्ये पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे अभूतपूर्व आणि आगळेवेगळे स्वागत करण्यात आले, ज्यामुळे दीर्घ सुट्टीनंतर शाळेत परतलेल्या मुलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.**



नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात विद्यादायिनी माता सरस्वतीच्या मूर्तीचे पूजन करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. पहिल्याच दिवशी शाळेचा परिसर रंगीबेरंगी फुगे आणि आकर्षक सजावटीने सजवण्यात आला होता. नवीन आणि जुन्या विद्यार्थ्यांमध्ये शाळेत येण्याचा उत्साह ओसंडून वाहत होता.

शाळेत पाऊल ठेवताच सर्व शिक्षकांनी मिळून विद्यार्थ्यांवर फुलांची उधळण केली. प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबपुष्प देऊन आणि पेढा भरवून त्यांचे स्वागत करण्यात आले. शिक्षकांच्या या आपुलकीच्या आणि प्रेमळ स्वागतामुळे नवीन विद्यार्थ्यांचा शाळेचा पहिला दिवस अत्यंत सुकर आणि आनंददायी ठरला. विद्यार्थ्यांच्या किलबिलाटामुळे संपूर्ण शाळेचा परिसर आनंदाने न्हाऊन निघाला होता.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या नाईक मॅडम, अग्निस मॅडम यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन अतिशय उत्कृष्ट पद्धतीने करण्यात आले होते.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, उत्साह आणि नव्या स्वप्नांची झलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. पालकांनीही शाळेने केलेल्या आगळ्यावेगळ्या स्वागताचे कौतुक करत विद्यार्थ्यांसाठी सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. नवीन शैक्षणिक वर्षाची ही उत्साहपूर्ण सुरुवात विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरत त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक प्रवासाची प्रेरणादायी नांदी ठरली. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत संस्कार, शिस्त आणि सर्वांगीण विकासाचा ध्यास घ्यावा, असा संदेश यावेळी शिक्षकांनी दिला.

### संस्थेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून शुभेच्छा..

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार सर, सचिव श्री. अशोक मोरे सर आणि खजिनदार सौ. सुरेखा पवार मॅडम यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मुलांचा हाच उत्साह वर्षभर टिकून राहो आणि त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठी प्रगती करावी, अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांनीही उत्साहाने आपल्या भावना व्यक्त करत शिक्षणाबाबतचा दृढ संकल्प व्यक्त केला. शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी नव्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

"मुलांच्या चेहऱ्यावरील हा आनंद आणि उत्साह पाहून शिक्षकांनाही एक नवी ऊर्जा मिळाली आहे. हे नवीन शैक्षणिक वर्ष सर्वच विद्यार्थ्यांसाठी प्रगतीचे आणि यशाचे ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे."

**- शाळा प्रशासन, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव.**

# विषारी दारू प्रकरणातील रुग्ण मृत्यूच्या दाढेतून बचावला!

## वायसीएम रुग्णालयातील तातडीच्या उपचारांमुळे रुग्णांना मिळाले नवजीवन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**फुगेवाडी विषारी दारू प्रकरणात बाधित तीनही रुग्णांची प्रकृती आता पूर्णपणे सुधारली असून त्यांना आज यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार या सर्व रुग्णांवर संपूर्णपणे मोफत उपचार करण्यात आले.**



> विषारी दारू प्रकरणातील बाधित रुग्णांना तातडीने आणि सर्वोत्तम उपचार मिळावेत यासाठी महापालिकेने आवश्यक त्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या. सर्व रुग्णांची प्रकृती सुधारून त्यांना घरी जाता येत आहे, ही समाधानाची बाब आहे. वायसीएम रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे.
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> विषारी दारू प्रकरणातील रुग्णांची स्थिती लक्षात घेऊन त्यांच्यावर तातडीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने उपचार करण्यात आले. विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी समन्वयाने काम करत रुग्णांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवले. वैद्यकीय विभागाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर केलेल्या उपचारांमुळे सर्व रुग्णांची प्रकृती पूर्णपणे सुधारणे शक्य झाले.
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिं.चिं.मनपा.

विषारी दारू सेवनामुळे गंभीर स्थितीत रुग्णांना वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात दाखल होताच तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू करण्यात आले. तसेच आवश्यक वैद्यकीय चाचण्या, औषधोपचार आणि विशेष निगा पुरविण्यात आली. रुग्णांच्या नातेवाईकांनाही वेळोवेळी आवश्यक ते सहकार्य व मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टर, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि आवश्यक औषधोपचार यांच्या मदतीने रुग्णांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली.

सदर रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत वायसीएम रुग्णालयाच्या मेडिसिन विभागाने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विभागातील अनुभवी डॉक्टरांनी रुग्णांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवत आवश्यक उपचार पद्धतींचा अवलंब केला. ज्यामुळे आता सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर झाली असून ते पूर्णपणे बरे होऊन निरोगी अवस्थेत घरी परतत आहेत. महापालिका प्रशासनाच्या तत्परतेमुळे आणि वायसीएम रुग्णालयातील वैद्यकीय यंत्रणेच्या समन्वित प्रयत्नांमुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचविणे शक्य झाले. यामुळे पुन्हा एकदा वायसीएम रुग्णालयाची आपत्कालीन आरोग्य सेवा आणि तज्ज्ञ वैद्यकीय कर्मचाऱ्यांची क्षमता अधोरेखित झाली आहे.

सदर रुग्णांच्या तब्येतीत सुधारणा आणण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. उज्वला अंदूरकर यांनी विशेष परिश्रम घेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली व रुग्णांच्या उपचारादरम्यान कोणतीही कमतरता राहू नये याची काळजी घेतली.

## महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशनचे चेअरमन संतोष बारणे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशन आणि पिंपरी-चिंचवड किकबॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक तथा महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशनचे चेअरमन संतोष बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या किकबॉक्सिंग स्पर्धा २०२६ उत्साहात पार पडल्या.**



या स्पर्धेला आमदार महेशदादा लांडगे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

यावेळी आमदार लांडगे यांनी क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने सकारात्मक भूमिका घेत असल्याचे अधोरेखित झाले. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेतील खेळाडू, प्रशिक्षक आणि आयोजकांना मोठी प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी संतोष बारणे म्हणाले की, "आज महाराष्ट्रात सुमारे २५ ते ३० हजार खेळाडू किकबॉक्सिंग या खेळाशी जोडले गेले आहेत. या खेळाच्या विकासासाठी आमदार महेशदादा लांडगे यांनी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली असून, भविष्यातही त्यांच्या मार्गदर्शनातून आणि सहकार्याने किकबॉक्सिंगला अधिक बळ मिळेल, याची मला पूर्ण खात्री आहे. राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर या खेळाला अधिक मोठी ओळख मिळवून देण्यासाठी त्यांचे मोलाचे योगदान राहील, असा मला विश्वास आहे. तसेच महाराष्ट्र किकबॉक्सिंग परिवारावर दाखवलेल्या प्रेम, आपुलकी आणि विश्वासाबद्दल बारणे यांनी आमदार लांडगे यांचे मनःपूर्वक आभार मानले. "चेअरमन म्हणून क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी त्यांच्यासोबत कार्य करण्याची संधी मिळत असल्याचा मला अभिमान आहे," अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

स्पर्धेत राज्यातील विविध भागांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले.

## जनगणना २०२७ चा पहिला टप्पा अंतिम टप्प्यात; घर सूचीकरण प्रक्रिया पूर्णत्वाकडे

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**



देशातील सर्वात मोठा लोकसहभागाचा उपक्रम असलेल्या जनगणनेद्वारे लोकसंख्या, निवास व्यवस्था, शिक्षण, आरोग्य तसेच सामाजिक व आर्थिक स्थितीविषयीची माहिती संकलित केली जाते. याच माहितीच्या आधारे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा आणि विकास आराखड्यांचे नियोजन केले जाते. त्यामुळे प्रत्येक घराची अचूक नोंद होणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, जनगणना ही देशाच्या विकास प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती प्रामाणिकपणे व अचूकपणे उपलब्ध करून द्यावी. जनगणनेतून प्राप्त होणारी माहिती भविष्यातील विकास धोरणे आणि सार्वजनिक सुविधांच्या नियोजनासाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे उर्वरित कालावधीत प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सहभाग नोंदवावा.

पिंपरी चिंचवड महापालिका उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार म्हणाले, घर सूचीकरण व घर गणनेच्या पहिल्या टप्प्याची मुदत संपण्यास अवघे सहा दिवस उरले आहेत. ज्या नागरिकांची माहिती अद्याप नोंदविण्यात आलेली नाही, त्यांनी जनगणना कर्मचाऱ्यांशी सहकार्य करून आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. जनगणनेचे यश हे नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून आहे.

जनगणना कर्मचाऱ्यांच्या भेटीदरम्यान नागरिकांनी आवश्यक माहिती तत्परतेने उपलब्ध करून देत या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. "आपली जनगणना, आपला विकास" या संकल्पनेतून प्रत्येक नागरिकाचा सहभाग देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे महापालिकेने नमूद केले.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School|Jain Minority Institution
BLOOD
DONATION
DRIVE
Saturday, 13 June 2026
TIME: 09:30 AM - 12:30 PM
LOCATION: SCHOOL CAMPUS
O
A
AB